# शालेय विद्यार्थ्यांकडुन शिवाजीनगर औद्योगिक वसाहतीत स्वच्छता मोहिम

## मनपा आयुक्तांनी केले कौतुक

**नांदेड दि.२३** : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडुन स्वच्छतेविषयी जनजागृती सुरु असताना आज शुक्रवारी (दि.२३) किड्स किंगडम पब्लीक स्कूल या इंग्रजी शाळेच्या ७० विद्यार्थी / विद्यार्थिनींनी शिवाजीनगर औद्योगिक वसाहतीतील पेट्रोल पंप ते नाना नानी पार्कदरम्यानच्या रस्त्याची साफसफाई करुन इतरांना स्वच्छतेची प्रेरणा दिली. मनपा आयुक्त डॉ. निपुण विनायक यांना ही बाब कळताच त्यांनी शिवाजीनगर भागात जाऊन विद्यार्थ्यांची भेट घेतली आणि हस्तांदोलन करुन त्यांचे कौतुक केले.

किड्स किंगडम शाळेतील सातवी - आठवीच्या वर्गात शिक्षण घेणारे ५३ विद्यार्थी व १५ विद्यार्थिनी आज सकाळी अचानक तोंडाला मास्क, डोक्यावर प्लॉस्टीकचे आच्छादन, हातात मोजे खराटे तसेच फावडे घेऊन रस्त्यावर उतरले. या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर सहकारी औद्योगिक वसाहतीतील आयटीआय पेट्रोलपंप ते नाना नानी पार्क दरम्यानच्या रस्त्याच्या दोन्ही बाजुने साफसफाई सुरु केली. ब्रिटीश कौन्सीलच्या वतीने आज दि. २३ रोजी सर्वत्र एक दिवसीय स्वच्छता मोहिम राबवण्याचे कळविण्यात आल्याने त्याचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांनी हा परिसर स्वच्छ केल्याचे शाळेच्या संचालिका सौ. संध्या माहेश्वरी व प्राचार्य सुनिल श्रीवास्तव यांनी सांगितले. मनपाच्या घनकचरा वाहतूक ठेकेदार, स्वच्छता निरिक्षक, सफाई कामगार व वाहतूक पोलिसांनी या उपक्रमाला आवश्यक ती यंत्रणा पुरवली.

आमच्या घरात साफसफाईसाठी कामगार आहेत, परंतु स्वच्छतेची जबाबदारी प्रत्येकाची आहे. किंबहुना कचरा रस्त्यावर न टाकता एका विशिष्ट ठिकाणी गोळा करावा, असे आवाहन करण्यासाठी आजची मोहिम राबवल्याचे मनोगत उपक्रमात भाग घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनींनी व्यक्त केले. या परिसरातून वाहनाव्दारे तसेच पायी जाणाऱ्या नागरिकांकडून विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले जात होते. मनपा आयुक्त आपल्या निवासस्थानावरुन महापालिकेकडे जात होते. त्यांनी परिसर स्वच्छ करणाऱ्या विद्यार्थ्यांची भेट घेतली व हस्तांदोलन करीत सर्वांचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम माहेश्वरी, मनपाच्या सहाय्यक आयुक्त सौ. वसुधा फड, क्षेत्रीय अधिकारी अविनाश आटकोरे, जनसंपर्क अधिकारी गोविंद करवा, उदयनगर भागात ओल्या कचऱ्यापासून खत निर्मितीसाठी पुढाकार घेणाऱ्या सौ. मुखेडकर यांच्या उपस्थितीत या उपक्रमाचा समारोप झाला. यावेळी सौ. मुखेडकर यांनी ओल्या कचऱ्यापासून खत निर्मितीचे महत्व विशद केले.

---

(सोबत तीन फोटो पाठवत आहे.)
सर्व छायाचित्रे : सतीश शर्मा, नांदेड.